म. ग्रं. सं. ठाणे
विषय — इतिहास
सं. क्र. 2258
10238
REFBK-0005916
REFBK-0005916

र. ग्रं. मं. ठाणें

नं. २

कि. ३ आणे


# चालू युद्धाचा इतिहास

लेखक

रा. का. तटणीस

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस,
मुंबई

REFBK-0005916



आजचें राजकारण

# चालू युद्धांतील महत्त्वाच्या घडामोडी

## १९३९

| | | |
|---|---|---|
| १ | सप्टेंबर | जर्मनीची पोलंडवर स्वारी |
| ३ | | ग्रेटब्रिटनची व फ्रान्सची जर्मनीविरुद्ध युद्धघोषणा |
| २९ | | वॉर्सोचा पाडाव |
| १ | डिसेंबर | रशियाची फिन्लंडवर स्वारी |

## १९४०

| | | |
|---|---|---|
| १२ | मार्च | रुसो-फिनिश युद्धाची समाप्ति |
| ९ | एप्रिल | जर्मनीचा नॉर्वे-डेन्मार्कवर हल्ला |
| २ | मे | दोस्त सैन्याची नॉर्वेमधून माघार |
| १० | | हॉलंड, बेल्जम, लक्झेंबुर्ग यांवर जर्मनीची स्वारी |
| १० | | मि. चर्चिल यांच्या मुख्य प्रधानकीची सुरुवात |
| १४ | | हॉलंडच्या प्रतिकाराचा शेवट |
| २८ | | बेल्जियम नरेशांची शरणागति |
| ३ | जून | डंकर्कमधून ब्रिटिश सैन्याची माघार |
| १० | | इटलीची ब्रिटन-फ्रान्सविरुद्ध युद्धघोषणा |
| १३ | | पॅरिसमध्यें जर्मन सेनेचा प्रवेश |
| १६ | | मार्शल पेतां फ्रान्सचे सूत्रधार |
| २१ | | फ्रान्सची युद्धतहकुबीवर सही |
| ३ | जुलै | फ्रेंच आरमाराचें ब्रिटिशांकडून निःशस्त्रीकरण |
| १८ | ऑगस्ट | ब्रिटिश सोमालीलँड इटलीच्या हातीं |
| २ | सप्टेंबर | अँग्लो-अमेरिकन आरमारी तह |
| १५ | | इटालियन सैन्याची इजिप्तमध्यें चाल |
| २७ | | बर्लिन-रोम-टोकिओ करारावर सह्या |
| १७ | ऑक्टोबर | ब्रह्मदेश मार्ग पुन्हां खुला |
| २८ | | इटलीची ग्रीसवर स्वारी |
| ९ | डिसेंबर | लिबियामधील ब्रिटिश मोहिमेचा प्रारंभ |

Printed at Shree/Laxmi Narayan Press, 364, Thakurdwar, Bombay 2

## मि. चर्चिल यांच्या शब्दांत

# चालू युद्धाचा इतिहास

ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान मि. **विन्स्टन चर्चिल** यांनीं ब्रिटनच्या युद्धकार्याचें नेतृत्व स्वीकारल्यानंतर, सांप्रतच्या महायुद्धांत ज्या ज्या घटना घडून आल्या व जे जे युद्धप्रयत्न करण्यांत आले, त्यांचा हा छोटासा इतिहास आहे. मि. चर्चिल यांनीं वेळोवेळीं जीं भाषणें केलीं, त्या भाषणांतील महत्त्वाच्या उताऱ्यांची गुंफण करूनच हा इतिहास सांगितला आहे. या इतिहासाचें एक वैशिष्ट्य हें कीं केवळ घडलेल्या प्रसंगांची ही जंत्री नव्हे; मानवसुलभ विकार, विचार, धडपड, आशा, निराशा, ईर्षा, आकांक्षा यांचें प्रतिबिंब या इतिहासांत पडलेलें आहे. मि. चर्चिल यांनीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं एका महान् कार्याची अवजड धुरा आपल्या खांद्यावर घेतली, चिकाटीनें ते आपल्या कार्याला लागले, निराशामय परिस्थितींत त्यांनीं आपल्या बांधवांना प्राप्त कर्तव्याचा आदेश दिला व त्यांच्यामध्यें प्रभावी चैतन्य निर्माण केलें.

**विपत्कालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें**
**सभें पांडित्याचा प्रसर समरीं शौर्य मिरवे**

हीं जीं महापुरुषाचीं लक्षणें आहेत, तीं मि. चर्चिल यांना पूर्णांशानें लागू पडतात, म्हणून त्यांचें नेतृत्व प्रभावी ठरलें आहे. आज ग्रेटब्रिटन मि. चर्चिल यांच्या नेतृत्वाखालीं मानवतेच्या शत्रूंचा पूर्ण निःपात करण्याच्या हिरीरीनें सामर्थ्यवान व संघटित होऊन उभें राहिलें आहे. महायुद्धाच्या या इतिहासांत मि. चर्चिल यांनीं स्वतः कोणता भाग उचलला व त्यांचें नेतृत्व कसें यशस्वी झालें याचेंही दिग्दर्शन या इतिहासांत आलें आहे. इतिहास घडविण्याचें भाग्य ज्याला लाभलें, अशा एका राष्ट्रपुरुषानें स्वतःच इतिहासकार बनून हा इतिहास सांगितला आहे.

### अधिकारसूत्रें हातीं घेण्यापूर्वी

मि. चर्चिल यांनीं ता. १० मे १९४० रोजीं मुख्य प्रधानपदाचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. युद्ध सुरू होऊन आठ महिने झाले होते. युद्धाच्या

पहिल्याच महिन्यांत म्हणजे सप्टेंबर १९३९ मध्यें नात्झींच्या सैन्यानें पोलंड पायदळीं घातला. यानंतर एप्रिल (स. १९४०) च्या दुसऱ्या आठवड्यांत नॉर्वेवर हिटलरनें झडप घातली. डेन्मार्कमध्यें विश्वासघातानें सैन्य घुसवून त्या देशाचाही जर्मनीनें ताबा मिळविला. मि. चर्चिल ज्या दिवशीं मुख्य प्रधान झाले, त्या दिवशीं हिटलरनें आपलें यंत्रसज्ज जर्मन सैन्य हॉलंड, बेल्जियम व लक्झेंबुर्ग या देशांत घुसडलें.

जर्मनी व इंग्लंड यांच्यामधील अंतर कमी होऊं लागलें. ज्या हल्ल्याच्या अपेक्षेनें फ्रेंच व ब्रिटिश सैन्यें आठ महिने फ्रान्समध्यें ठाण मांडून बसलीं होतीं, तो पश्चिम आघाडीवरील जर्मनीचा विजली हल्ला, ता. १० मे च्या पहाटेपासूनच सुरू झाला.

ही परिस्थिति निःसंशय आणीबाणीची होती. राष्ट्राच्या मागणीला मान देऊन मि. **नेव्हल चेंबर्लेन** यांनीं आपला राजिनामा बादशहांना सादर केला आणि मि. चर्चिल मुख्य प्रधान झाले. ता. १० मे रोजीं "नात्झीशाहीला थारा देऊं नका. हिटलरच्या अधिकारप्राप्तींतून जी आपत्ति जगावर कोसळणार आहे, तिच्याबद्दल उदासीन राहूं नका" असा इशारा ब्रिटिश मुत्सद्द्यांना सतत देत रहाणाऱ्या चर्चिलवरच त्यांच्या भविष्यवाणीतलें संकट निवारण्याची कामगिरी आली.

## रक्त–कष्ट–अश्रु—

चर्चिल यांना हें एक मोठें दिव्यच आहे असें वाटलें. नवी जबाबदारी शिरावर घेतांच त्यांनीं ता. १४ मे रोजीं पार्लमेंटपुढें भाषण केलें. ते म्हणाले, "रक्त, कष्ट, अश्रु, घाम यांखेरीज जनतेला देण्यासारखें माझ्याजवळ कांहींच नाहीं. मीं माझ्या सहकाऱ्यांना हेंच सांगितलें आणि या सभेलाही हेंच सांगतों. अति तापदायक दिव्यांतून आपल्याला पार पडावयाचें आहे. धडपड आणि हालअपेष्टा हाच दुःखद क्रम यापुढें महिनेच्या महिने चालू रहाणार आहे."

परिस्थतीचें गांभीर्य सांगून त्यांनीं भावी कार्याकडे लोकांचें लक्ष वेधलें. "भविष्यकालांत आमचें धोरण, आमचा कार्यक्रम कोणता राहील याचें उत्तर मी एकाच शब्दांत देतों. तो शब्द म्हणजे **युद्ध** ! जमिनीवर, समुद्रा-

वर, आकाशांत, जेथें पाहिजे तेथें युद्ध करावयाचें. सारी शक्ति एकवटून, सर्व सामर्थ्य पणाला लावून हें युद्ध चालू ठेवावयाचें. भीषण जुलूमशाहीचा निःपात करण्यासाठीं, मानवी कृष्णकृत्यांची आजवरची अत्यंत काळीकुट्ट यादीही ज्यापुढें फिकी ठरावी अशीं कृत्यें करणाऱ्या सैतानशाहीला मूठमाती देण्यासाठीं, अखंड, अविरत लढत रहावयाचें, हाच आमचा यापुढचा कार्यक्रम ! हेंच यापुढचें आमचें धोरण !!"

"आमचें उद्दिष्ट, आमचें ध्येय काय ?—त्याचेंही उत्तर एकाच शब्दांत मी देतों. **विजय** हाच तो शब्द ! कितीही कष्ट पडोत, कितीही कंटकमय, खडतर असा आमचा मार्ग असो; अंतिम विजयाचें ध्येय आमच्या दृष्टीसमोरून अणुमात्रही ढळणार नाहीं. किंबहुना, विजय संपादनावांचून आम्हाला दुसरी गतिच नाहीं. कांहींही असो, पण मी स्वतः विजय मिळण्याच्या दुर्दमनीय आशेनें, दृढ विश्वासानें आणि अपार उत्साहानें कार्याला हात घातला आहे. आपणां सर्वांचें या प्रसंगीं सहाय्य मागण्याचा मला अधिकार पोंचतो आणि म्हणून माझें सर्वांना सांगणें आहे, कीं "चला, पुढें व्हा, संघशक्तीच्या बलावर आपण पुढची मजल मारूं या, आणि विजय संपादनाचें ध्येय गाठूं या."

हा स्फूर्तिदायक संदेश ब्रिटिश राष्ट्रालाच काय पण लोकशाहीची जोपासना करणाऱ्या जगालाही संजीवनीसारखा वाटला. ता. १९ मे रोजीं केलेल्या भाषणांत मि. चर्चिल म्हणाले, " ब्रिटिश व फ्रेंच जनता युरोपच्याच नव्हे तर अखिल मानव जातीच्या सहाय्याला धावून गेली आहे. त्यांच्या पाठीशीं झेक्, पोल, नॉर्वेजियन्, डेन , डच, बेल्जियन्, इत्यादि पददलित राष्ट्रांचे स्वातंत्र्यप्रेमी लोक गोळा झाले आहेत. आम्हीं विजय संपादन केला नाहीं, तर रानटी युगाची अंधारी रात्र या सर्वांवर पडेल व त्या काळोखांत चांचपडत रहाण्याची पाळी या सर्वांवर येईल."

पण विजयाचा मार्ग त्या वेळीं एवढा अंधुक व अस्पष्ट झाला होता, कीं तीक्ष्ण दृष्टीच्या व सरावलेल्या कर्णधाराखेरीज इतर कोणाच्याही नजरेच्या टापूंत तो येणें शक्य नव्हतें. पश्चिम आघाडीवरील परिस्थिति अतिशय बिकट झाली होती. अनेक आशादायक अपेक्षांचा चक्काचूर उडाला होता.

जर्मन सैन्याच्या लोंढ्यापुढें व फंदफितुरीमुळें हॉलंडचा पांच दिवसांपेक्षां जास्त दिवस टिकाव लागला नाहीं. ता. १५ मे रोजीं डच सेनापतींनीं शस्त्र खालीं ठेवल्याचें जाहीर केलें. हॉलंडची राणी **विल्हेल्मिना** व तिचें मंत्रि-मंडळ इंग्लंडच्या आश्रयाला आलें. हॉलंडच्या मागोमाग जर्मनीनें फ्रान्सवर हल्ला चढविला. फ्रान्स व बेल्जममध्यें तुंबळ रणकंदन त्या वेळीं माजून राहिलें. " जर्मनांनीं बॉंबफेकी विमानें व अवजड रणगाडे यांचा हल्ला मोठ्या शिताफीनें चढवून मॅजिनो तटबंदीच्या उत्तरेकडील फ्रेंचांची फळी फोडली. पहिले दोन दिवस तर पुढचा मुलुख त्यांना फारसा प्रतिकार न होतांच पादाक्रांत झाला. जर्मन सैन्याच्या यंत्रसज्ज तुकड्या जेथें जेथें घुसल्या, तेथें तेथें भीति व गोंधळ माजला. त्यांच्या मागोमाग जर्मन पायदळ, मोटार-लॉऱ्यांतून पुढें घुसूं लागलें. त्याला तोंड देण्याची फ्रेंचांनीं खटपट केली व त्यांना शाही विमानदलाचें उत्कृष्ट सहकार्य मिळालें. दोस्तांच्या पिछाडीवर जर्मन पोंचले, तसेंच कांहीं कांहीं ठिकाणीं फ्रेंच सैन्यही जर्मनांच्या पिछाडीवर होतें. पण ही परिस्थिति धोक्याची होती. " ता. २८ मे रोजीं बेल्जियमचे राजे व सेनापति **लिओपोल्ड** यांनीं जर्मनांना शरणचिठ्ठी लिहून दिली !

बेल्जियन्सच्या शरणागतीमुळें फ्लँडर्समधील ब्रिटिश सैन्याची अवस्था मात्र अत्यंत कठिण झाली. त्यांच्या रसदीच्या वाटा जर्मन सैन्यानें बंद करून टाकल्या. दोन्ही बाजूंनीं तें वेढलें गेलें. अखेर मोठ्या निकरानें लढत व माघार घेत डंकर्क बंदरांत हें सैन्य येऊन थडकलें, आणि तेथून ब्रिटिश आरमारानें आपल्या सामर्थ्याच्या जोरावर सुरक्षितपणें या सैन्याची स्वदेशीं रवानगी केली.

" डंकर्कच्या त्या भूभागावर जर्मनांनीं यंत्रसज्ज तुकड्या, पायदळ, तोफखाना यांचा एकवटून मारा चालविला होता. पण त्यांची ती आटापीट फुकटच गेली. माघार घेणाऱ्या ब्रिटिश व फ्रेंच सैन्यानें इतक्या निकराचे तडाखे हाणले, कीं स्वदेशीं परत जाणाऱ्या बाकीच्या सैन्यांच्या मार्गांत विशेष मोठे अडथळे उत्पन्न करण्याचा धीर शत्रूला झाला नाहीं. ब्रिटिश विमान-दलानें जर्मन विमानदलाच्या मुख्य विभागांचा सपशेल पराभव केला. त्यांच्या व ब्रिटिशांच्या नाशाचें प्रमाण ४ : १ असें पडलें. ब्रिटिश आर-

मारानें निरनिराळ्या प्रकारचीं सुमारें एक हजार जहाजें कामाला लावून सुमारें ३,३५,००० ब्रिटिश व फ्रेंच सैनिक मृत्यूच्या जबड्यांतून सोडवून स्वदेशीं परत आणले." ( ४ जून '४० चें भाषण )

## ' रक्ताचा बिंदु असेपर्यंत—'

डंकर्कची ही शर्तीची झुंज अपूर्व अशीच झाली. अत्यंत अभिमान वाटण्याजोगी ही घटना असली, तरी ती पराभवाच्या पोटीं निर्माण झाली होती. ब्रिटिश सैन्याची शस्त्रसामुग्री किती प्रचंड प्रमाणांत या लढाईंत गमावली याची कल्पना चर्चिल यांनीं करून दिली. " कितीही हानि सोसावी लागली, तरी ब्रिटिश बेटांचें संरक्षण आम्ही रक्ताचा अखेरचा बिंदु शिल्लक असेल तोंपर्यंत करीत राहूं." असें त्यांनीं बजबजावून सांगितलें. ह्या कार्यासाठीं ब्रिटनमधील भांडवलदार व कामगार एकवटले आहेत असा निर्वाळा त्यांनीं दिला. " ब्रिटिश बेटांचा मोठा भाग शत्रूच्या ताब्यांत गेला आणि उपासमार होण्याची पाळी आम्हांवर आली, तरी सुद्धां समुद्रापलीकडच्या ब्रिटिश साम्राज्यांत, ब्रिटिश आरमारी सामर्थ्यासह आमचें निशाण फडकतें ठेवून, हा लढा अखेरपर्यंत चालू ठेवूं." ही चर्चिल यांची वीरवाणी डंकर्कच्या माघारीमुळें भयानक व काळ्याकुट्ट झालेल्या वातावरणांत त्यांच्या धीरोदात्त नेतृत्वाला साजण्याजोगी होती.

पण डंकर्कच्या या आघातापेक्षांही मोठा आघात, ब्रिटिश राष्ट्राला यानंतर सहन करण्याची पाळी आली. इटलीनें ता. १० जून रोजीं दोस्तांविरुद्ध युद्ध पुकारलें आणि ता. १७ जून रोजीं दोस्तांची एकजूट भंग पावली. दोस्त म्हणून त्यावेळपर्यंत सुख–संकटांतून साथ केलेल्या फ्रेंच राष्ट्रानें– अथवा या राष्ट्रांतील एका देशद्रोही टोळक्यानें शत्रूला सामील होऊन ब्रिटिशांना दगा दिला. ता. २५ जून रोजीं पार्लमेंटमध्यें मि. चर्चिल म्हणाले :

"फ्रान्सवर पराभवाचा प्रसंग ओढवल्याशिवाय रहात नाहीं, हें भवितव्य ज्या वेळीं फ्रेंच पुढाऱ्यांना स्पष्ट दिसूं लागलें, त्या वेळीं मुख्य प्रधान **एम्. रेनो** यांनीं बोलावल्यावरून ता. १३ जून रोजीं लॉर्ड **बीव्हरब्रुक** व परराष्ट्र मंत्री यांच्यासह टूर्स येथें मीं त्यांची मुलाखत घेतली. " दोस्तांच्या संमतीशिवाय तहाचीं बोलणीं करावयाचीं नाहींत या उभय राष्ट्रांमध्यें ठरलेल्या

अटीच्या जबाबदारींतून फ्रान्सला मुक्त करण्याची ब्रिटनची तयारी आहे काय ?" असा एम्. रेनो यांनीं मला सवाल केला. रेनो यांच्या सूचनेला संमति देणें मला युक्त वाटेना. आम्हीं असा ठराव केला कीं, रेनो यांनीं साह्यासाठीं आणखी एकदां अमेरिकेला विनंती करून पहावें. पण ता. १६ जून रोजीं एम्. रेनो यांचा बोर्डो येथून मला निरोप आला कीं, अमेरिकेचें उत्तर समाधानकारक नाहीं. तेव्हां फ्रान्सला अँग्लो-फ्रेंच करारांतील जबाबदारींतून मुक्त करण्यांत यावें.

मीं लागलीच मंत्रिमंडळाची बैठक भरविली. फ्रेंचांवर कोसळलेली आपत्ति लक्षांत घेऊन आम्हीं असें सुचविलें कीं, युद्धतहकुबीबाबतचीं बोलणीं चालू असलेल्या काळांत फ्रेंच आरमार ब्रिटिश बंदरांत आणून ठेवावें. युद्धतहकुबीच्या बोलण्याशीं ब्रिटिश सरकारचा मुळींच संबंध नाहीं, युद्ध चालू ठेवण्याचाच त्यांचा निश्चय कायम आहे, असें फ्रेंच सरकारला कळविण्यांत आलें. त्याच रात्रीं (१७ जून) एम्. रेनो यांच्या निमंत्रणावरून त्यांच्या भेटीला जाण्यासाठीं गार्डींत देखील बसलों होतों. तोंच त्यांचें मंत्रिमंडळ पदच्युत झाल्याची व मार्शल पेतां यांच्या नेतृत्वाखालीं नवें मंत्रिमंडळ नेमल्याची बातमी मला समजली.

फ्रेंच आरमार जर्मनांच्या हातीं पडूं न देण्याची खबरदारी घेऊं अशीं कैक आश्वासनें आम्हाला मिळालीं. पण गेल्या रविवारीं जेव्हां युद्धतहकुबीच्या अटी मीं वाचल्या, तेव्हां साहजिकच मला फार खेद झाला व फ्रेंच सरकारच्या कृत्याबद्दल अत्यंत आश्चर्यही वाटलें. त्यांतील आठव्या कलमाचा आशय असा आहे कीं, फ्रेंच वसाहतींच्या संरक्षणासाठीं ठेवलेल्या फ्रेंच आरमाराखेरीज बाकी सर्व फ्रेंच आरमार जर्मन व इटालियन अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं निःशस्त्र व निकामी करण्यांत यावें. म्हणजे फ्रेंच जहाजें पूर्ण सशस्त्र अशाच स्वरूपांत जर्मन व इटालियन अधिकाऱ्यांच्या ताब्यांत जावयाचीं आहेत."

फ्रेंच आरमार जर्मनीच्या हातीं पडण्यासारखें होतें. त्याचा बंदोबस्त ब्रिटिश सरकारनें कसा केला हें चर्चिल यांनीं ४ जुलैच्या भाषणांत पार्लमेंटास सांगितलें. ते म्हणाले :

" काल सकाळीं आम्हीं फ्रेंच आरमाराचा बराच मोठा भाग आमच्या ताब्यांत घेतला. अलेक्झांड्रियांत आसऱ्यासाठीं असलेलें फ्रेंच आरमार आमच्या नियंत्रणाखालीं घेण्याची व्यवस्था केली आहे. त्या देशांत असलेलें फ्रेंच लष्कर बरेंचसें **डी गॉल** यांच्या निशाणाखालीं गोळा झालें व बाकीचें परत फ्रान्सला जाणार आहे...**ओरॅान** येथें फ्रेंचांचें मोठें आरमार होतें; तें जर्मनांच्या ताब्यांत जाऊं नये म्हणून त्यांच्या दर्यासारंगाशीं वाटाघाटी करण्यास आमचे अधिकारी गेले. पण प्रत्यक्ष भेट झाली नाहीं म्हणून लेखी मसुदा त्यांना धाडला. त्यांना तीन मार्ग सुचविले होते; परंतु दिवसभर वाट पाहूनही कांहींच जबाब आला नाहीं, तेव्हां मोठ्या नाखुषीनें फ्रेंच आरमारावर तोफा डागण्याचा वखत ब्रिटिशांवर आला. त्या लढाईत चांगलें मोठें फ्रेंच जहाज बुडालें; कांहीं जाया झालीं, एक पळून गेलें; आणि अशा प्रकारें जर्मनांच्या कचाटींतून तें वाचविण्याचे प्रयत्न सफल झाले." ता. १४ जुलै रोजींच्या पार्लमेंटमधील भाषणांत चर्चिल यांनीं ही सर्व हकीकत पुनः सांगितली. या भाषणांत त्यांनीं ब्रिटनवरील स्वारीची शक्यता असल्याचें बजावलें आणि केव्हांही हल्ला झाला तरी तो परतविण्यासाठीं कंबर कसून जागरूक रहाण्याचा इशारा त्यांनीं ब्रिटिशांना दिला. "गुलामगिरीच्या बेड्या लंडनभोंवती पडण्यापेक्षां तें शहर बेचिराख व उध्वस्त झालेलें एक वेळ पत्करेल," असें म्हणून चर्चिल यांनीं आपला प्रतिकाराचा निश्चय जाहीर केला. "आपल्याएवढ्याच जबरदस्त इच्छाशक्तीच्या प्रतिस्पर्ध्याकडून होणाऱ्या चिवट प्रतिकाराची चुणूक हिटलरला अजून लागलेली नाहीं. आतांपर्यंत जीं राष्ट्रें हिटलरच्या यंत्रसज्ज सैन्यानें चिरडून टाकलीं, त्यांपैकीं बहुतेक फंदफितुरीनें पोखरून गेलीं होतीं. आम्हीं त्या दृष्टीनें पूर्ण निरोगी आहोंत. आमच्या राष्ट्राचा देह व अंतःकरण हीं दोन्हीही अजून खंबीर व मजबूत आहेत," हे चर्चिल यांनीं आत्मविश्वासानें उच्चारलेले शब्द ब्रिटिश जनतेच्या व जगाच्या चित्तांतही चैतन्याच्या विद्युल्लहरी निर्माण केल्यावांचून राहिले नाहींत.

पण ब्रिटिश जनतेच्या विलक्षण खंबीरपणामुळें लंडन उध्वस्त होण्यापर्यंत परिस्थिति जाऊं शकली नाहीं. हा चार महिन्यांचा अवधि म्हणजे ब्रिटिश

जनतेच्या कसोटीचाच काळ होता. हिटलरच्या स्वारीची संभाव्यता क्षणो-क्षणीं भासत होती. ता. १५ सप्टेंबर रोजीं लंडनमध्यें आपला मुक्काम होईल अशी जाहीर प्रौढी हिटलरनें मारली होती. पण स्वारीच्या तयारीनें फ्रान्सच्या किनाऱ्यावर सज्ज असलेल्या जर्मन सेनेला इंग्लिश खाडी उतरण्याचा धीर झाला नाहीं. म्हणून सहस्रावधि जर्मन बॉंबफेकीं विमानें नित्यश: ब्रिटिश बेटांवर धाडी घालण्यासाठीं फिरूं लागलीं; पण निधड्या छातीचे शूर ब्रिटिश वैमानिक त्यांनाही पुरून उरले. ब्रिटनवर जर्मनांना सरशी करतां आली नाहीं. दर दिवशीं जबर मार खाऊन त्यांचीं विमानें नष्ट होऊं लागलीं. ब्रिटिश विमानदलानें त्यांच्यावर निर्विवाद मात करून आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें. "शत्रूची इच्छा असेल तितका काल ही लढाई खुशाल चालू ठेवावी, आमची त्याला पूर्ण तयारी आहे; एवढेंच नव्हे, तर जितका अधिक काल ती चालेल, तितकें त्यांच्यावर मात करणें आम्हाला सोपें जाईल," असे चर्चिल यांनीं उद्गार काढून आपल्या वाढत्या विमानो-त्पादनाबद्दल व त्यांच्या श्रेष्ठत्वाबद्दल ग्वाही दिली. वैमानिक हल्ल्यांची ही लढाई एकांगीच नव्हती. ब्रिटनवर जसे जर्मनांचे वैमानिक हल्ले होत होते, त्याचप्रमाणें ब्रिटिशांचेही जर्मनींतील लष्करी महत्त्वाच्या ठाण्यांवर प्रभावी हल्ले सुरू झाले होते.

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांत ब्रिटनवरील वैमानिक हल्ल्यांची शिकस्तच झाली. अपेक्षेप्रमाणें सावज आवाक्यांत येत नसलेलें पाहून एखाद्या हिंस्र-पशूनें पिसाळून डरकाळ्या फोडींत बेभान होऊन मुसंड्या मारीत सुटावें, त्याचप्रमाणें हिटलरचीं विमानें ब्रिटनवर तुटून पडलीं. त्यानंतर ता. ११ व ता. १९ सप्टेंबर रोजीं चर्चिल म्हणाले, "बिनलष्करी स्त्री-पुरुष व मुलें यांची कत्तल करून या महान नगरींतील जनतेच्या मनांत आपण भीति निर्माण करून तिला नमवूं, अशी आशा हिटलरला वाटत आहे. पण ब्रिटिश राष्ट्राच्या प्रभावी इच्छाशक्तीची त्याला कल्पना नाहीं. लंडनच्या नागरिकांची वृत्ति किती चिवट आहे हेंही त्याला माहीत नाहीं. पार्लमेंटरी संस्थांच्या प्रस्थापनेसाठीं याच नागरिकांच्या पूर्वजांनीं झगडा केला होता. त्यांचे हे वंशज स्वत:च्या प्राणांपेक्षाही स्वातंत्र्याची कदर अधिक करतात.



मि. विन्स्टन
चर्चिल
भाषण करतांना

लंडनवरील
ाँबहल्ला-पाडलेलें
जर्मन विमान



पण आपल्या या राक्षसी योजनेनें त्यानें अखिल जगांतील ब्रिटिश जनतेच्या अंत:करणांत एक नवी ज्योत पेटवून ठेवली. लंडनमध्यें त्यानें पेटविलेल्या आगीच्या सार्‍या खुणा नष्ट झाल्यानंतरही ही ज्योत तेवत राहील, नाझींच्या जुलुमांचा युरोपमधला अखेरचा अवशेष जळून खाक होईपर्यंत हा चेतविलेला अग्नि सारखा पेटत राहील.”

लंडनवरील वैमानिक हल्ल्याची भीषणता सप्टेंबरच्या तिसर्‍या आठवड्यांत जास्त वाढली, तेव्हां बकिंगहॅम राजवाड्यावर देखील जर्मन विमानांनीं बॉंब फेकले. “ राजेसाहेब व महाराणी यांनाही प्रजेच्या संकटांत भागीदार व्हावें लागल्यामुळें त्यांचे व प्रजेचे संबंध जास्त जिव्हाळ्याचे झाले ” असे उद्गार चर्चिल यांनीं या वेळीं काढले.

जर्मन हल्ल्यांची भीषणता जसजशी वाढूं लागली आणि ब्रिटिश जनता त्या अग्निदिव्यांतून जसजशी पार पडूं लागली तसतसें अमेरिकन लोकमतही ब्रिटिशांचा पाठपुरावा करण्यास अधिकाअधिक सिद्ध होऊं लागलें. अमेरिकेचे व ब्रिटिशांचे संबंध अधिक दृढ झाले. अटलांटिकमधील वैमानिक व आरमारी तळांच्या बदला ५० अमेरिकन विनाशिका ब्रिटिशांना देण्याचा करार उभय राष्ट्रांनीं केला. “ अमेरिका व ब्रिटन या दोन इंग्रजी बोलणार्‍या लोकशाही राष्ट्रांचे संबंध या करारामुळें अधिक निकट आले” ( ता. २२ ऑगस्ट ).

फ्रान्सच्या शरणागतीमुळें मध्यपूर्वेकडील प्रदेशांतही गोंधळ माजला. सोमालीलँडमधील ब्रिटिश सैन्य काढून घ्यावें लागलें. नंतर पुढें सप्टेंबरमध्यें इटालियन लष्कराच्या हालचाली होऊं लागल्या. त्यांनीं सोलम, बगबग व सिदीबराणी हीं ठाणीं काबीज केलीं. ब्रिटिश सैन्यांनीं तीं आधींच खालीं केलीं होतीं. मग, डी गॉल यांनीं पश्चिम आफ्रिकेंतील डाकार बंदरावर हल्ला चढविण्याची तयारी केली; परंतु डी गॉल यांना ज्या मदतीचें आश्वासन आधीं मिळालें होतें, ती मदत आयत्या वेळीं डाकारमधील अधिकार्‍यांकडून मिळाली नाहीं. म्हणून परिस्थिति एकदम बदलली व थोडीफार चकमक होऊन, कित्येक जहाजें उभयपक्षीं गमावून, डी गॉल परतले. त्यांच्याच जबाबदारीवर ब्रिटिशांनीं नुसतें सहाय्य देण्याचें ठरविलें होतें.

चढाईचें धोरण स्वीकारण्याची ब्रिटिशांची तयारी होत होती हें याच सुमाराला सिद्ध झालें. रोम–बर्लिन गट्टींत टोकिओ ता. २७ सप्टेंबर रोजीं सामील झाल्यावर, जपानसंबंधीं धोरण बदलणें ब्रिटिश राष्ट्राला भाग पडलें. जपानचें चीनवरील आक्रमण चालूच होतें. जपानच्या भिडेखातर ब्रिटिशांनीं बर्मारोड कांहीं दिवस बंद करून चीनला नाखूष केलें होतें. पण आतां ब्रिटिशांचें धोरण बदललें. ता. १७ ऑक्टोबरपासून बर्मारोड पुनः पूर्ववत् खुला झाला व चीनला दारूगोळ्याचा भरपूर पुरवठा होऊं लागला. ह्या सर्व घटनांचा उल्लेख करून चर्चिल म्हणाले, " जपाननें नुकतीच त्रिराष्ट्र-करारावर सही केली आहे. त्या करारामुळें जपानला काय फायदा आहे हें कळत नाहीं; पण जपाननें ज्या अर्थीं त्यावर सही केली आहे, त्या अर्थीं त्यांत आणखी कांहीं गुप्त कलमें असावींत असा संशय येऊं लागला आहे. इटली व जर्मनी जपानच्या मदतीला कसे काय धावून जाणार? या त्रिराष्ट्र-कराराचा मुख्य रोख अमेरिकेविरुद्ध असून रशियालाही शह देण्यांचा त्यांचा दुसरा हेतु आहे."

नोव्हेंबर १९४० च्या सुमारास ब्रिटनवरील जर्मन वैमानिक हल्ल्यांचें प्रमाण कमी होत चाललें. ब्रिटिश वैमानिकदलापुढें आपली मात्रा चालणें अशक्य होय, अशी खात्री पटून हिटलरनें पवित्रा बदलला. ता. ५ नोव्हेंबर १९४० च्या कॉमन्स सभेंतील भाषणांत अटलांटिक मोहिमेचा मि. चर्चिल यांनीं निर्देश केला. " वैमानिक हल्ल्यापेक्षांही अटलांटिकमध्यें नुकताच सुरू झालेला पाणबुड्यांचा उपद्रव अधिक जाचक होऊं लागला आहे," असें सांगून ते म्हणाले, " आयर्लंडच्या दक्षिण व पश्चिम किनाऱ्यावरील वैमानिक तळांचा उपयोग आम्हाला होत नसल्यामुळें ब्रिटनच्या व आयर्लंडच्याही व्यापाराचें संरक्षण करणें आम्हाला कठिण होत चाललें आहे. जहाजांच्या नव्या बांधणावळी पुऱ्या होत आहेत. नाविक नुकसान खूप झालें आहे, तरीही युद्धाच्या सुरुवातीस व्यापारी जहाजांचें जेवढें प्रमाण होतें, तेवढें तें आजही आम्हीं कायम राखूं शकलों आहों. त्याशिवाय पूर्वीच्या तटस्थ राष्ट्रांचींही जहाजें आमच्या नियंत्रणाखालीं आलीं आहेत."

ता. २८ ऑक्टोबर रोजीं इटलीनें ग्रीसवर केलेल्या स्वारीबाबतचें

ब्रिटिशांचें धोरण सांगतांना चर्चिल म्हणाले, " इटॅलियन हुकुमशहानें आपल्या नेहमींच्या गिधाडी वृत्तीला अनुसरून चिमकुल्या पण अमर अशा ग्रीक राष्ट्रावर आकस्मिक झडप घातली. ग्रीसकडून कसल्याही प्रकारचा अपराध घडला नसतांना मुसोलिनीनें ही स्वारी केली. सामोपचाराची रीत तर त्यानें गुंडाळून ठेविली. ग्रीक शहरावर मुसोलिनीची विमानें सध्यां निर्दयपणें तुटून पडत आहेत. ग्रीक स्त्री-पुरुष-मुलांची हत्त्या वाढत्या संख्येनें घडूं लागली आहे. ग्रीसच्या राजानें, व ग्रीक जनतेनें या प्रकाराला भीक न घालतां मुसोलिनीशीं अखेरपर्यंत झुंज देण्याचें ठरविलें आहे. ग्रीकांनीं तटस्थपणाचें धोरण काटेकोरपणानें पाळलें होतें. तरीही त्यांच्यावर ही धाड पडावयाची ती पडलीच. अशा परिस्थितींत ग्रीसच्या सहाय्यार्थ जें कांहीं आम्हांला करतां येईल तें आम्ही अवश्य करूं. क्रीट बेटांत आरमारी व वैमानिक तळ आम्हीं स्थापन केले आहेत. त्यामुळें आरमाराचें व वैमानिक दलाचें माऱ्याचें क्षेत्र अधिक विस्तृत होईल. दक्षिण इटलींतील तळांवर व इटालियन शहरांतील लष्करी महत्त्वाच्या ठिकाणांवर आमच्या विमानांनीं बॉंबफेक करण्यासही सुरुवात केली आहे. याशिवाय शक्य त्या दुसऱ्या प्रकारांनीं ग्रीसला सहाय्य देण्याची आम्ही खटपट करीत आहों."

इटलीचा समाचार घेण्याचें अभिवचन एका आठवड्यांतच ब्रिटिश आरमारानें पुरें करून दाखविलें. ता. १३ नोव्हेंबर रोजीं " सभेला मला एक सुवार्ता कथन करावयाची आहे " अशी सुरुवात करून चर्चिल यांनीं टॅरन्टो येथील इटलीच्या आरमारावर ब्रिटिश आरमारानें केलेल्या धाडसी हल्ल्याचा वृत्तांत निवेदन केला. ह्या हल्ल्यांत ब्रिटिश आरमारी विमानांनीं " लिटोरिओ " वर्गातील ३५ हजार टनांचें लढाऊ जहाज साफ निकामी करून टाकलें. काव्हूरवर्गातील एक जहाज व दोन क्रूझरें व इतर दोन छोटया लढाऊ नौका यांनाही जबर मार देण्यांत आला. ही हकीकत सांगून चर्चिल म्हणाले, " आतां इटलीचीं मोठीं लढाऊ जहाजें अशीं फक्त तीनच उरलीं आहेत. ब्रिटिश आरमार किती साहसी व निधड्या वृत्तीनें लढत आहे याची उत्कृष्ट खूण, ' जर्व्हिस बे ' या लढाऊ जहाजानें व्यापारी जहाजांच्या काफल्याचें रक्षण करतांना ' डॉइशलॅंड ' सारख्या मोठया

जहाजांशीं टक्कर दिली व अखेर लढतां लढतां जलसमाधि घेतली, त्या एकाच उदाहरणावरून मिळूं शकेल."

स. १९४० चा अखेरचा महिना उजाडला. इटलीचे ग्रह पुरतेच फिरल्याचे दिसून आलें. आल्बेनियांत इटालियन सैन्याला ग्रीकांकडून जबरदस्त तडाखे बसूं लागले. आफ्रिकेमध्यें लिबियांत ब्रिटिश सैन्यानें अत्यंत जोराचा तडाखा हाणला.

ता. ९ फेब्रुआरी १९४१ रोजीं मि. चर्चिल यांनीं रेडिओवरून भाषण केलें. त्या वेळीं ते म्हणाले, " हिटलरची स्वारी फोल ठरविणें हा आमचा पहिला विजय; दुष्ट अत्याचारांमागील त्याचा उद्देश उलथून पाडणें हा दुसरा विजय होय. युरोपच्या दोन्ही हुकूमशहांपैकीं, हतबल फ्रान्सच्या पाठींत खंजीर खुपसून सवंगपणें साम्राज्य पदरांत पाडूं पहाणारा दुष्ट, कपटी, कावेबाज, कृष्णहृदयी असा जो इटालियन हुकूमशहा त्याचा पाय सध्या खोडयांत अडकल्यासारखा झाला आहे. केवळ आपली पाशवी सत्ताकांक्षा पुरविण्यासाठीं मुसोलिनीनें ग्रीसवर प्रहार केला. पण शूर ग्रीकांकडून ठोकरा खात त्याला अपमानकारक परिस्थतींत माघार घ्यावी लागली. ग्रीकांच्या तडाख्यांनीं अल्बेनियामध्यें मुसोलिनी वळवळत पडला असतांनाच आमचे सेनापति ज. **वॅव्हेल** व **विल्सन** यांना येथून व हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादि ठिकाणाहून नव्या सैन्यांची, युद्धसामुग्रीची विशेषतः रणगाडयांची बहुमोल मदत पोंचविण्याचें काम चालू होतें. या नव्या सैन्याच्या सहाय्यानें त्यांनीं लिबियामध्यें एकापेक्षां एक महत्त्वाचे विजय संपादून आफ्रिकेंतील इटालियन लष्करी सत्ता कायमची नष्ट केली आहे. सेंट मॅथ्यूचें प्रसिद्ध वचन जनरल वॅव्हेल यांच्या नजरेस मीं आणलें. 'मागा म्हणजे मिळेल, शोधा म्हणजे सांपडेल, ठोठावा म्हणजे उघडेल' असें हें वचन आहे. नाइलच्या सैन्यानें हें वचन पूर्णपणें कृतींत उतरविलें आहे. अवघ्या आठ आठवडयांच्या अवधींत ४०० मैलांची मजल आमच्या सैन्यानें मारली. इटलीचें दीड लाख सैन्य या भागांत होतें. तें सारें नष्ट अगर कैद झालें आहे.

" लिबियामध्यें ही मोहिम चालू असतांनाच तेथून दक्षिणेकडे १५००

मैलांवर ब्रिटिश व हिंदी सैन्य सूदानमधून इटालियन्सची हकालपट्टी करून त्यांच्या इरिट्रियाच्या वसाहतींत चाल करून जात होतें. त्या योगानें अबिसीनियांतील इटालियन सैन्याचा चहूंबाजूंनीं कोंडमारा होणार होता. पश्चिमेकडून ब्रिटिश सैन्याचा दुसरा विभाग अबिसीनियांत चाल करीत असून पांच वर्षांपूर्वी दरोडा घालून हिरावून नेलेलें आपलें स्वातंत्र्य पुनः संपादन करण्यासाठीं अबिसीनियन राष्ट्रीय तुकड्यांनींही उठाव केला असून स्वातंत्र्य युद्धांत त्यांचें नेतृत्व स्वीकारण्यासाठीं व आपलें सिंहासन पुनः मिळविण्यासाठीं हबशी बादशहा हेले सेलासी तेथें जातीनें लढत आहेत."

आफ्रिकेंतील ही मोहिम एप्रिल मध्यें बहुतेक पुरी होत आली. अबिसीनिया, इरिट्रिया व सोमालीलँड येथील बहुतेक प्रदेश ब्रिटिश साम्राज्य सेनेनें पादाक्रांत केला. ता. ९ एप्रिल १९४१ रोजीं कॉमन्स सभेला मि. चर्चिल यांनीं युद्धाचा वृत्तांत सांगतांना लिबियामधील माघार घेण्याचीं कारणें स्पष्ट केलीं. त्यांनीं हिंदी सैनिकांच्या शौर्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला. ते म्हणाले, "इरिट्रियांतील इटालियन सैन्याच्या प्रतिकाराचें मुख्य ठाणें जें **केरेन** ते अनेक दिवसांच्या निकराच्या लढाईनंतर सर झालें. या साऱ्या लढायांचा भार बहुतेक हिंदी सैन्यानें वाहिला होता. सर्व प्रसंगीं व सर्व ठिकाणीं हिंदुस्थानच्या सुपुत्रांची शौर्यपरंपरा या सैन्यानें उत्कृष्ट पराक्रम गाजवून कायम राखली. इरिट्रियाची राजधानी अस्मारा व मुख्य बंदर मसावा हीं दोन्ही आमच्या हातीं आहेत. शत्रूंच्या जहाजांना तांबडा समुद्र बंद झाला आहे. अबिसीनियांतील हरार शहर आमच्या हातीं आहे व त्यानंतर आमच्या सैन्यानें आदिसअबाबाचा कबजा घेतला आहे. ड्यूक ऑफ ॲओस्टा यांच्या सैन्यानें आतां पहाडाचा आसरा घेतला आहे व तेथें ॲबिसीनियन राष्ट्रीय सैन्य त्यांचा पिच्छा पुरवीत आहे."

पण जगाचें लक्ष या कालांत बाल्कन्समधील घडामोडींनींच जास्त वेधून घेतलें. जर्मन सैन्याच्या जोराच्या हालचाली तेथें सुरू झाल्या होत्या आणि नवे देश नात्झी तलवारीला बळी पडत होते. ता. ९ एप्रिलच्या मि. चर्चिल यांच्या भाषणाचा स्वाभाविकपणें हाच मुख्य विषय झाला.

"गेल्या सहा महिन्यांत जर्मनीनें हंगेरीवर वर्चस्व प्रस्थापित केलें.

रुमेनियांत सैन्य पाठवून तो देशही कबजांत घेतला व तशीच तऱ्हा बल्गेरियाची केली. या साऱ्या प्रकाराबद्दल स्वाभाविकच वाढती चिंता आम्हांला वाटूं लागली होती. जर्मन यंत्रसज्ज सैन्य व मोटरदल आणि विमानदल यांची अव्याहत भरती या देशांत होत होती. त्या इटालियन नीचांची विश्वासघातकी धाड येऊन पडेपर्यंत ग्रीसनें पूर्ण तटस्थतेचें धोरण पाळलें होतें. सहाय्याची याचना ग्रीसनें जेव्हां केली, त्या वेळींच वैमानिक व युद्धसामुग्रीचें शक्य तें सहाय्य आम्हीं त्याला दिलें. दरम्यान, डिसेंबर-पासून हंगेरी व रुमेनिया यांमधून जर्मन सैन्याची बल्गेरियामध्यें भरती चालली होती. बल्गेरियन सरकारच्या हेतुपूर्वक दुर्लक्षामुळें जर्मन विमान-दलांतील लोक साध्या पोषाखांत बल्गेरियांत येऊन तेथील विमानतळ त्यांनीं ताब्यांत घेतले. बल्गेरिया गट्टी राष्ट्रांना सामील झाल्याचें जाहीर होण्यापूर्वीच सारा बल्गेरिया व त्यांतील महत्त्वाचीं ठाणीं जर्मन सेनेनें व्यापलीं. यानंतर जर्मन सैन्य उघडपणें मोठ्या संख्येनें बल्गेरियांत उतरूं लागलें. या सैन्याचा मुख्य उद्देश सालोनिकावर हल्ला चढविणें हा होता. या शहरांत आजच चार वाजतां जर्मन सैन्यानें प्रवेश केला.

"वास्तविक बाल्कन्समध्यें युद्धाची आग पेटावी हा आमचा केव्हांही हेतु वा धोरण नव्हतें. इटालियन्सशीं युद्ध जुंपलें तरी ग्रीकांच्या मनाविरुद्ध ते इतर भानगडींत गुंतले जाऊं नयेत असेंच सक्त धोरण आमचें होतें; तथापि ग्रीक मुख्य प्रधानांची मि. **ईडन** यांनीं प्रथम भेट घेतली त्या वेळीं त्या सरकारनें चढाईखोर शत्रूविरुद्ध स्वातंत्र्यासाठीं अखेरपर्यंत लढण्याचा आपला निर्धार जाहीर केला; मग ब्रिटन, तुर्कस्तान अथवा युगोस्लाव्हिया यांचें सहाय्य मिळो वा न मिळो, असेंही ते म्हणाले. त्याच निर्धाराला अनुसरून इटली व जर्मनी या दोघांविरुद्ध ब्रिटनच्या बाजूनें लढण्याचा आपला उद्देश त्यांनीं सांगितला. आमच्या दृष्टीनें धोक्यांत उडी घेण्याचा जरी हा प्रकार होता, तरी ग्रीकांबरोबर आम्ही लष्करी साह्याचा करार केला व ग्रीसकडे साम्राज्य सैन्यांच्या तुकड्या रवाना झाल्या. युगोस्लाव्हियाच्या मंत्रिमंडळानें तटस्थतेचें धोरण स्वीकारण्याचा प्रयत्न केला. पण जर्मनीच्या विषारी तंत्रांचा प्रयोग पुनः एकदां चालू झाला.

बल्गेरियन वनश्रीचें नेत्रसुख घेण्याच्या मिषानें जर्मन प्रवाशांच्या २५ तुकड्या युगोस्लाव्हियावर रोख ठेवून बल्गेरियांत उतरल्या !

"इतकें झाल्यावर स्लाव्ह राष्ट्राच्या देहावरच नव्हे तर मनावरही जर्मनांचा पूर्ण ताबा राहूं शकेल अशा एका करारावर पॉलची सही घेतली. अखेर युगोस्लव्हियाच्या जनतेला आपल्या संकटाची यथार्थ कल्पना आली. मग बंडाची एकच लाट चहूंकडे उसळून देशाला अपमानास्पद गुलामगिरींत लोटण्यास सिद्ध झालेल्यांना लोकांनीं पदच्युत केलें आणि आपलें स्वातंत्र्य व स्वाभिमान यांचें रक्षण, स्वप्राणांची आहुती देऊन करण्याचा निर्धार केला. अजगरानें आपलें भक्ष्य गिळंकृत करून आपल्या विषारी लाळेंत त्याला घोळविण्यास सुरुवात करावी, पण तितक्यांत अकस्मात् त्याच्या वेटोळ्यांतून तें भक्ष्य कोणीं तरी सोडवून घ्यावें, अशा परिस्थितींत त्याची जी निराशा होईल ती सुद्धां कमी तीव्र ठरूं शकेल, एवढी जबरदस्त निराशा या प्रकरणीं हिटलरला अनुभवावी लागली आहे....त्यानंतर ऑस्ट्रियांत जमा करून ठेवलेल्या जर्मन सैन्यानें युगोस्लाव्हियाच्या उत्तर सरहद्दीवर जोराची चाल केली, व या सैतानश्रेष्ठानें वैरभावाची भेसूर आरोळी ठोकून प्रत्यक्ष स्वारीची सूचना दिली. बेल्ग्रेडचें खुलें शहर बॉंबहल्ल्यांनीं बेचिराख करून टाकलें व त्याच वेळीं दक्षिण सर्बियामध्यें पश्चिमेकडे जर्मन यंत्रसज्ज तुकड्या प्रचंड वेगानें चाल करून गेल्या. दुसरा प्रबळ सेनाविभाग ग्रीसच्या सरहद्दीवर धडाक्यानें पुढें घुसला."

बाल्कन्समधली ही लढाई मे महिना उजाडेपर्यंत संपुष्टांतही आली. ता. १० एप्रिल रोजीं युगोस्लाव्हियापैकीं क्रोएशियाची राजधानी झाग्रेब जर्मन सैन्यानें बळकावली व फितुर क्रोट पुढारी डॉ. **पावेलिच** याच्या नेतृत्त्वाखालीं क्रोएशियाचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण केल्याची घोषणा केली. ता. १२ एप्रिल रोजीं सर्बियांतील मोनॅस्टिर हें शहरही जर्मन सैन्यानें सर केलें; युगोस्लाव्हियाचा प्रतिकार साफ थंडावला. राजे **पीटर** देश सोडून दोस्तांच्या आश्रयास गेले. ता. २३ एप्रिलला ग्रीसची राजधानी अथेन्सहून क्रीटला हलविण्यांत आली आणि प्रतिकार चालू ठेवण्यांत हशील नाहीं, अशा अर्थाचें पत्र ग्रीक सरकारनें ब्रिटिशांना धाडलें. ता. २७ रोजीं अथेन्स

नाझींच्या हातीं पडलें व तेथें जनरल **साराजोग्लु** याच्या नेतृत्त्वाखालीं नाझी नियंत्रित नकली ग्रीक सरकार नेमलें. ग्रीसमध्यें पाठविलेल्या ६० हजार साम्राज्यसेनेपैकीं ४५ हजार सैन्य तेथून काढून घेतलें व तीन हजार सैन्य त्या मोहिमेंत कामास आलें. ता. ३० एप्रिल रोजीं ही वार्ता मि. चर्चिल यांनीं कॉमन्स सभेंत जाहीर केली; परंतु दोस्तांच्या दुर्दैवाची परंपरा एवढ्यावर थांबली नाहीं. क्रीट बेटावरही हजारों जर्मन पॅराशूट सैनिक ता. २१ मे रोजीं अवचित उतरले व त्यांनीं विमानतळ ताब्यांत घेऊन विमानांतून येणाऱ्या सैन्याच्या झुंडींना उतरण्याची सोय करून दिली. एका आठवड्यांत बऱ्याच घनघोर चकमकी होऊन हें बेट जर्मनांनीं ताब्यांत घेतलें. जलमार्गानें कुमक घेऊन येणाऱ्या जर्मन सैन्याचा प्रतिकार करीत असतां ब्रिटिश आरमारापैकीं ' ग्लूस्टर ', 'फिजी' हीं दोन क्रूझरें व 'ज्यूनो' 'ग्रेहाऊंड' 'केली' व ' काश्मीर ' ह्या विनाशिका नष्ट झाल्या.

या क्रीटप्रकरणीं ता. १० जून रोजीं कॉमन्स सभेंत ब्रिटिश सरकारवर कडक टीका झाली; परंतु मि. चर्चिल यांनीं या टीकेला समर्पक उत्तर देऊन टीकाकारांचीं तोंडें बंद केलीं. क्रीट बेटाच्या बचावाची पुरी व्यवस्था कां केली नाहीं, हा टीकाकारांचा मुख्य आक्षेप होता. त्याला उत्तर देतांना मि. चर्चिल म्हणाले :

"क्रीटमध्यें पुष्कळसे विमानतळ उभारावयाचे तर त्यांच्या बचावासाठीं विमान विध्वंसक तोफांची व विमानांची उत्तम तरतूद करावयास पाहिजे. नुसतेच ते उभारून ठेवणें चुकीचें झालें असतें. क्रीटमध्यें जे दोन विमानतळ होते त्यांच्या रक्षणार्थ पुरेशा हवामार तोफा ठेवल्या नाहींत; कारण अटलांटिकची लढाई चालू आहे. क्रीटमध्यें एरव्हींच्या ज्या हवामार तोफा पाठवितां आल्या असत्या त्या अटलांटिकच्या लढाईंत व्यापारी जहाजांना होणारा वैमानिक उपद्रव टाळण्यासाठीं गुंतल्या आहेत. शिवाय आमची घरची व मध्य पूर्वेकडील मोहिमेंतील गरजही भागवावी लागत होती."

चर्चिल यांनीं उल्लेखिलेली ही अटलांटिकची लढाई या सुमारास विशेष जोरांत सुरू होती. ता. ११ मार्च रोजीं ' लीज अँड लेंड बिल ' पास झालें व प्रे. **रूझवेल्ट** यांना, युद्धसामुग्रीचें सहाय्य गरजू राष्ट्राला देण्याचा अधि-



लीबिया-टेहळणी
करणारे हिंदी
अधिकारी



रशिया—नागरिक दलाची लष्करी तयारी

कार मिळाला, म्हणून अमेरिकेची ही युद्धसामुग्री ब्रिटनकडे वाढत्या प्रमाणांत रवाना होऊं लागली व तिला पायबंद घालण्याचा आटोकाट प्रयत्न जर्मन पाणबुड्या व विमानें यांनीं अटलांटिकमध्यें चालविला होता. या लढाईत ब्रिटिश व जर्मन आरमाराची एक उल्लेखनीय चकमक ता. २३ मेच्या सुमारास घडून आली व तींत 'बिस्मार्क' या जर्मन युद्धनौकेनें 'हुड' या ब्रिटिश युद्धनौकेचा बळी घेतला. त्यानंतर दोन दिवस 'बिस्मार्क'चा सतत पाठलाग करून ब्रिटिश आरमारानें त्याला समुद्राचा तळ दाखविला, व 'हुड'चा बदला घेतला. मे महिन्यांतील आणखी दोन उल्लेखनीय घडामोडी म्हणजे ता. १० मे रोजीं हिटलरचा उजवा हात हेर हेस याचें स्कॉटलंडमध्यें विमानांतून अचानक झालेलें आगमन, व इराकमध्यें जर्मन चिथावणीवरून रशीद अली या इराकी फितूर पुढाऱ्यानें केलेली बंडाची उठावणी. हिंदी सैन्याची बंदोबस्तासाठीं रवानगी करून इराकची बंडाळी लौकरच मिटविली आणि ता. ३१ मे रोजीं ग्रेट ब्रिटन व इराक यांमध्यें युद्धतहकुबीचा तह झाला.

पण मे महिन्यापेक्षांही जून महिना अधिक महत्त्वाचा होता. ता. ८ जून रोजीं स्वतंत्र फ्रेंच सैन्यानें ब्रिटिश व हिंदी सेनेच्या सहाय्यानें सिरियावर चाल सुरू केली; परंतु अत्यंत महत्त्वपूर्ण व जगाला हादरा देणारी अशी घटना अनपेक्षितपणें ता. २२ जून रोजीं घडून आली. युद्धाच्या प्रारंभापासून दोस्त असलेल्या रशियावर या दिवशीं हिटलरनें स्वारी केली. कट्ट्या शत्रूचे मित्र झालेले स्टॅलिन व हिटलर पुनः एकमेकांचे हाडवैरी बनले. ब्रिटन व रशिया यांचे नवे संबंध जगाला जाहीर करतांना मि. चर्चिल म्हणाले :

"आज पहाटे चार वाजतां हिटलरनें रशियावर स्वारी केली. विश्वासघाताच्या त्याच्या नेहमींच्या तंत्रानुसारच हा सारा बनाव बनून आला आहे. उभय राष्ट्रांचा परस्पर अनाक्रमणाचा करार आज पावणेदोन वर्षें अंमलांत होता. जर्मनीनें त्याची अंमलबजावणी होत नसल्याची तक्रार केलेली नाहीं. या करारांचें बुजगावणें कायम ठेवून, श्वेतसमुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंतच्या आघाडीवर विमानदलांची यंत्रसज्ज तुकड्यांची आस्तेआस्ते पण पद्धतशीर

भरती जर्मनीनें आजवर चालू ठेवली. युद्धाची घोषणा न करतां अथवा निर्वाणीचा खलिता न धाडतां, जर्मन सैन्यानें आकस्मिकपणें रशियन सरहद्द ओलांडली, रशियन शहरांवर जर्मन बॉम्सची वृष्टि होऊं लागली; आणि आदल्याच रात्रीं रशियाच्या स्नेहाच्या मोठमोठ्या गप्पा मारणारा जर्मन वकील, एका तासानें या युद्धाची खबर देण्यासाठीं रशियन परराष्ट्रीय मंत्र्यांच्या भेटीस गेला !! जो अत्याचार नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड व बेल्जियम यांच्या बाबतींत हिटलरनें व ग्रीसच्या बाबतींत त्याचाच हस्तक, तो कावेबाज कोल्हा मुसोलिनी, यानें केला, त्याचीच मोठ्या प्रमाणावर झालेली ही पुनरावृत्ति आहे; परंतु मला याचें कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं. या आगामी संकटाची स्पष्ट सूचना मीं स्टॅलिनला पूर्वींच दिली होती.

"आम्ही व इतर राष्ट्रांनींच या नात्झी दरोडेखोराला आजवर जें हें प्रचंड व भयंकर लष्करी यंत्र क्रमशः उभारूं दिलें, तें निरुपयोगी रहाणें अशक्य होय. त्याचे तुकडे पाडून तें सर्वस्वीं नष्ट केलें नाहीं तर त्याची गति अखंड चालू राहील, व त्याखालीं लाखों–नव्हे क्रोडों–लोकांचीं घरेंदारें कोसळून पडतील हें खास ! या यंत्राला नरमांसाचें व खनिज तेलाचें खाद्य लागतें. त्याकरितां या रक्तपिपासू भुकेकंगालानें आपल्या यांत्रिक सैन्याला रक्तपात, कत्तल, लूटमार, विध्वंस यांचें नवें क्षेत्र खुलें करून दिलें आहे. गरीब रशियन शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, सैनिकांच्या तोंडची भाकर तो हिरावून घेणार आहे; त्यांच्या पिकांवर, त्यांचे नांगर चालविणाऱ्या तेलावर, तो दरोडा घालणार आहे आणि मानवजातीच्या इतिहासांत तोड नसलेली दुष्काळी परिस्थिति युरोपवर तो ओढवून आणणार आहे......रशियन सैनिक आपल्या मायभूमीचें, आपल्या पूर्वजांनीं ज्या शेतांची नांगरणी आजवर केली त्या शेतांकुरणांचें, ज्या घरांत त्यांच्या बायकामुली त्यांच्या योगक्षेमासाठीं परमेश्वराची प्रार्थना करण्यांत मग्न झाल्या आहेत, त्या घरादारांचें संरक्षण करण्यास सज्ज झालेल्या मला आज दिसत आहेत.... आणि त्यावर नात्झी लष्करी यंत्राचा भेसूर, विक्राळ आघात होत असल्याचेंही मला दिसत आहे. आमचें धोरण या परिस्थितींत काय राहील, हें मला आज जाहीर करावयाचें आहे.

"पण त्या धोरणाबद्दल शंका वाटण्याची तरी काय जरूरी आहे? आमच्यापुढें एकच ध्येय, एकच उद्दिष्ट आज आहे. **हिटलरचा आणि त्यांच्या नात्झी राजवटीचा शेवटचा अवशेष नष्ट करण्याचा आम्हीं निर्धार केला आहे.** या निर्धारापासून आम्हाला कोणीही–अगदीं कोणीही–परावृत्त करूं शकणार नाहीं. हिटलरशीं अथवा त्याच्या टोळक्यापैकीं कुणाही इसमाशीं आम्ही सामोपचाराचीं बोलणीं करण्यास कदापि तयार होणार नाहीं. आम्ही त्यांच्याशीं जमिनीवर लढूं, दर्यावर झुंजूं, अस्मानांत झगडूं. या पृथ्वीला ग्रासणाऱ्या या ग्रहांचा नि:पात होईपर्यंत आणि हिटलरच्या जोखडांतून जगांतील देशांची मुक्तता होईपर्यंत परमेश्वराच्या सहाय्यानें आम्ही अव्याहत लढत राहूं. नात्झीशाहीविरुद्ध जें जें राष्ट्र, जी जी व्यक्ति झुंज देण्यास सज्ज झाली आहे, त्या त्या प्रत्येक राष्ट्राला, त्या त्या प्रत्येक व्यक्तीला, आमचें सहाय्य मिळेल. या उलट जें राष्ट्र, जी व्यक्ति हिटलरची कास धरून चालत आहे तें राष्ट्र व ती व्यक्ति आम्हांला दुश्मनासारखी आहे...अर्थातच रशिया व रशियन जनता यांना जें जें सहाय्य आम्हांला देतां येईल तें आम्ही देऊंच देऊं; जगांतल्या आमच्या साऱ्या दोस्त राष्ट्रांना व स्नेह्यांनाही हाच मार्ग स्वीकारण्याची व आमच्याप्रमाणेंच अखेरपर्यंत विश्वासपूर्वक व चिकाटीनें तो चोखाळण्याची आमची विनंती आहे."

चर्चिल यांनीं जाहीर केलेल्या याच धोरणानुसार ता. २१ जुलै रोजीं ब्रिटन व रशिया यांच्यामध्यें युद्धसहाय्याबाबतचा करार झाला.

ह्या करारामागोमाग परस्पर सहकार्याच्या रूसो-पोलिश करारावरही ता. ३० जुलै रोजीं लंडन येथें सह्या झाल्या. तत्पूर्वीं ता. १८ रोजीं अशाच प्रकारचा परस्पर सहाय्याचा झेक-रशियन करार घडून आला होता. रशियानें स.१९३९ च्या सप्टेंबरांत पोलंडचा मुलुख घेतांना जर्मनीशीं जो तह केला होता, तो या रूसो-पोलिश करारानें रद्द ठरला व रशियांतील पोलिश युद्धकैद्यांमधून एक लक्ष पोलिश सैन्य उभारण्याचें ठरलें. सिरियामध्यें चाललेल्या लढाईवरही पडदा पडला. " सिरियाच्या लढ्याबाबत उभयपक्षांनीं लष्करी ठराव करून या लढ्याची समाप्ति केली." सिरियामध्यें

ब्रिटिशांचा कसलाच फायदा साधण्याचा हेतु नव्हता. सिरिया व लेबॅनन यांचें स्वातंत्र्य त्यांनीं मान्य केलें.

या वर्षांतली दुसरी एक महत्त्वाची व व्यापक स्वरूपाची घटना म्हणजे प्रे. रूझवेल्ट व मि. चर्चिल यांची ता. १४ ऑगस्ट रोजीं अटलांटिक सागरावर मुलाखत आणि युद्ध हेतूसंबंधीं उभयतांची आठ कलमी घोषणा होय. प्रत्येक राष्ट्राचा स्वयंनिर्णयाचा व स्वातंत्र्याचा हक्क या घोषणेनें मान्य केला. दर्या वाहतुकीसाठीं सर्वांना खुला असावा, आर्थिक विकासाला अवकाश मिळावा व चिरकालीन शांततेसाठीं शस्त्रसंन्यासाचें तत्त्व आचारांत यावें, इत्यादि तत्त्वें या घोषणेंत मान्य करण्यांत आलीं. ता. २४ ऑगस्ट रोजीं मि. चर्चिल यांनीं रेडिओवरून भाषण केलें. तेव्हां अटलांटिक घोषणेचा संदेश जगाला सांगतांना ते म्हणाले :

"प्रे. रूझवेल्ट यांची व माझी अटलांटिक सागरावर भेट झाली. युद्ध-हेतु निश्चित करण्यापेक्षां, अमेरिका व ब्रिटिश राष्ट्रसंघ यांनीं जें ध्येय ठरविलें आहे त्याचीं साधीं, सरळ व युद्धकाळाला साजेशीं सूत्रें, सर्व राष्ट्रांना—विशेषतः जित व पीडित राष्ट्रांना—सादर करावीं हा आमचा हेतु होता. गेल्या युद्धाच्या अखेरीस दोस्तांनीं जें धोरण स्वीकारलें होतें त्यांत व प्रस्तुतच्या घोषणेंत महत्त्वाचे भेद आहेत, त्याकडे कोणीही दुर्लक्ष करूं नये. यापुढें पुनः युद्धें होणारच नाहींत असें या वेळीं अमेरिका व ग्रेट ब्रिटन यांनीं गृहीत धरलेलें नाहीं. उलट पक्षीं कोणत्याही काळीं युद्धाची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून, गुन्हेगार राष्ट्रांचें परिणामकारक तऱ्हेनें निःशस्त्रीकरण व स्वतःच्या संरक्षणाची योग्य तरतूद करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. जर्मन व्यापारावर जादा निर्बंध घालून त्यांना मारून टाकण्याचें जुनें धोरण आम्हीं त्याज्य ठरविलें आहे. जागतिक व आम्हां उभय राष्ट्रांच्या हिताच्या दृष्टीनें कोणतेंही मोठें राष्ट्र मागासलेलें रहावें किंवा आपलें जीवन संपन्न करण्याचीं साधनें त्याला दुरावलीं जावींत, हें योग्य नव्हे, असा निष्कर्ष आम्हीं काढला. हीं दोन्हीं तत्त्वें व्यापक परिणामी आहेत व त्यांच्याकडे सर्व राष्ट्रांनीं बारकाईनें लक्ष पुरविणें जरूर आहे."

हिटलरच्या नव्या युगाचा अर्थ, श्रेष्ठ जातीचें राज्य हा होतो आणि

करडा प्रशियन अंमल व पोलिसांच्या जरबेची कडक शिस्त. यांच्यावरच हें त्याचें नवें युग आधारलेलें आहे, हें या भाषणांत चर्चिल यांनीं स्पष्ट केलें. रशियामागून ब्रिटन व त्यानंतर अमेरिका असा हिटलरच्या आक्रमणाचा क्रम असून एका नंतर दुसरें या त्याच्या तंत्रानुसारच तो वागणार आहे; व अमेरिकेबरोबर याच कारणासाठीं उघड शत्रुत्व पत्करण्याची त्याची आज इच्छा नाहीं, हेंही त्यांनीं विशद करून सांगितलें. या भाषणांत मि. चर्चिल यांनीं जपानला इशारा दिला. " हें आक्रमण थांबविणें आतां अवश्य झालें आहे. सामोपचारानें या प्रकरणीं तडजोड घडवून आणण्याचा शक्य तो प्रयत्न होईल; पण हा प्रयत्न फलद्रूप झाला नाहीं तर त्या परिस्थितींत अमेरिकेची बाजू व ब्रिटनची बाजू एकच असेल. "

## ' कल्पना सहन होत नाहीं पण–'

हाच इशारा सुमारें अडीच महिन्यांच्या अवधीनंतर ता. ९ नोव्हेंबर रोजीं लंडनच्या मॅन्शन हाउसमध्यें मेयरच्या वार्षिक मेजवानीच्या प्रसंगीं मि. चर्चिल यांनीं जोरदार भाषेंत पुन: उच्चारला. ते म्हणाले : " ब्रिटिशांचे व जपानचे संबंध सलोख्याचे रहावे असाच प्रयत्न गेलीं चाळीस वर्षे आम्हीं करीत आलों आहोंत......जपान व इंग्लंड यांचें युद्ध जुंपण्याची कल्पना मला सहन होत नाहीं; तथापि अमेरिका व जपान यांचें युद्ध सुरू झाल्यास एका तासांत ब्रिटिश साम्राज्य जपानशीं युद्ध पुकारल्याखेरीज रहाणार नाहीं.....आज सतत पांच वर्षे जनरल **चिआंग कै शेक** यांच्यासारख्या शूर व थोर नेत्याच्या नेतृत्त्वाखालीं चिनी जनतेनें स्वातंत्र्याप्रीत्यर्थ व देशसंरक्षणासाठीं जो एकाकी व अत्यंत कौतुकास्पद लढा चालविला आहे, त्यामुळें कोणाचें हृदय उचंबळून येणार नाहीं ? चीनच्या या लढ्याच्या अखेरीस चिनी जनतेला स्वातंत्र्यप्राप्ति झाली नाहीं तर तें एक मोठेंच अरिष्ट कोसळल्यासारखें होईल. गेल्या वर्षी आमची आर्थिक परिस्थिति बिकट झाली होती. अमेरिकन डॉलर मिळविण्यासाठीं काय करावें याची पंचाईत पडली होती. कसें तरी करून पन्नास कोटी पौंड आम्हीं अमेरिकेला पाठविले. पण पैशाची व्यवस्था कशी करावी हा प्रश्न होता. या ऐन आणीबाणीच्या वेळीं उधार-उसन-वटीचा कायदा पास करून अमेरिकनांनीं

औदार्याला प्रत्यक्ष वाट करून दिली. या कायद्यानुसार तीन अब्ज पौंड, जागतिक स्वातंत्र्यासाठीं देण्याघेण्याचा हिशेब न ठेवतां–आणि हीच गोष्ट विशेष उल्लेखनीय व महत्त्वाची आहे–पाठविण्यांत आले. अमेरिकन लोकशाहीमध्यें पैसा हाच परमेश्वर आहे, ही उपहासोक्ति आतां कुणालाही उच्चारतां येणार नाहीं.

उधार-उसन-वट कायदा हें आजपर्यंतच्या साऱ्या मानवी इतिहासांतील अत्यंत औदार्याचें असें अद्भूतपूर्व कृत्य होय, यांत संदेह नाहीं. पण आम्हीही ह्या वाढत्या औदार्याला व साह्याला अपात्र ठरलों नाहीं. आम्हींही स्वतः या कार्यात आर्थिक दृष्ट्या अतुल, अनुपम असा स्वार्थत्याग केला आहे व करीत आहों."

ह्या भाषणापूर्वीच्या काळांतल्या म्हणजे ऑगस्ट ते नोव्हेंबरमधील घटनांचा ओझरता निर्देश करणें जरूर आहे. ऑगस्टच्या अखेरीस,जर्मनांचीं इराणमधील कारस्थानें उलथून पाडण्यासाठीं ब्रिटन व रशिया यांच्या जोडसैन्यानें त्या देशांत प्रवेश केला; व तो देश आपल्या नियंत्रणाखालीं आणला. इराणमधून हिंदुस्थानवर स्वारी करण्याचा हिटलरचा डाव हुकवून रशियाची पिछाडी व त्याच्या रसदीच्या वाटा सुरक्षित राखण्याची चोख व्यवस्था केली. इराणचे रेझाशहा पेहलवी यांनीं राज्यत्याग केला व त्यांचे पुत्र गादीवर आले. या अवधींत हिटलरनें युक्रेन प्रांत काबीज करून क्रिमियावर चाल केली. त्याच्या फौजा लेनिन्ग्राड, मॉस्को, सेबास्टॅपूल, रोस्टोव्ह यांच्या दाराशीं धडका देऊं लागल्या.

## जपानचा विश्वासघातकी प्रहार

अमेरिकेबरोबर जपाननें कुरापत काढून अमेरिकेकडून होणाऱ्या युद्धपुरवठ्यामध्यें व्यत्यय आणूं नये ह्याच इराद्यानें वस्तुतः मॅन्शन हाऊसमध्यें केलेल्या भाषणांत मि. चर्चिल यांनीं जपानला इशारा दिला होता. अर्थात् हा इशारा कृतींत उतरविण्याजोगी तयारी ब्रिटननें आपल्या अतिपूर्वेकडील भागांत केलेली नव्हती हें सहज आकलन होण्याजोगें आहे; पण चढाईखोर जपाननें या परिस्थितीचाच फायदा घेतला आणि जपानचे प्रतिनिधी अमेरिकन सरकारशीं तडजोडीचीं बोलणीं करण्यांत गुंतले असतां

ता. ७ डिसेंबर रोजीं अमेरिकेबरोबर युद्ध पुकारून हवाई बेटांतील अमेरिकेच्या पर्ल बंदरावर हल्ला केला आणि फिलिपाइन्स, मलाया, डच ईस्ट इंडीज यांवरही आक्रमण सुरू केलें. ता. ९ रोजीं ग्रेटब्रिटनचीं दोन अजस्त्र लढाऊ जहाजें, प्रिन्स ऑफ वेल्स व रिपल्स, हीं जपानी बॉंबहल्ल्यामुळें समुद्राच्या तळाला गेलीं व पासिफिकमधील ब्रिटिश नाविक सामर्थ्याला या नुकसानीमुळें जोराचा धक्का बसला. जपानचें हें आक्रमण गतीच्या बाबतींत हिटलरच्या गरुड भरारीलाही लाजविणारें होतें. अवघ्या तीन महिन्यांच्या अवधींत त्यानें मलाया पादाक्रांत केला. सिंगापूर लढविणें अशक्य झाल्यामुळें तेथील आरमारी तळ उडवून देऊन सिंगापूरच्या शिबंदीनें आपलीं शस्त्रें खालीं ठेवलीं. ब्रह्मदेशांत घुसून जपाननें रंगून ताब्यांत घेतलें. जावाचा प्रतिकार निष्फळ ठरला. सुमात्राही जपाननें व्यापला. बाटान द्वीपकल्प वगळलें, तर फिलिपाइन्समध्येंही लढा देण्याजोगें असें कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. सिंगापूरचा पाडाव हा तर ब्रिटिश साम्राज्यांच्या दृष्टीनें मोठाच लष्करी पराभव होता. ऑस्ट्रेलियांतील डार्विन् बंदरानेंही जपानी बॉंबचा प्रसाद चाखला. या परिस्थितीवर मात करणें आणि अधिक चिकाटीनें, अधिक निर्धारानें लढा चालू ठेवणें अवश्य होतें. मि. चर्चिल यांनीं जपानी चढाईमुळें निर्माण झालेली ही बिकट परिस्थिति कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवतां पार्लमेंटपुढें निवेदन केली आणि विश्वासाचा कौल मागितला. ४६४ विरुद्ध १ एवढ्या बहुमतानें कॉमन्स सभेनें सरकारवर असलेला आपला विश्वास व्यक्त केला. त्यानंतर लोकमताचा बोज ठेवण्यासाठीं त्यांनीं आपल्या मंत्रिमंडळांत फेरबदल करून धडाडीच्या व अधिक विश्वासपात्र अशा व्यक्तींची मंत्रिमंडळांत नेमणूक केली. रशियांतील शिष्टाई यशस्वी करणारे ग्रेटब्रिटनचे मॉस्कोमधील वकील सर स्टॅफर्ड क्रिप्स यांची लॉर्ड प्रीव्हि सील या हुद्द्यावर योजना करून कॉमन्स सभेचें नेतृत्व मि. चर्चिल यांनीं त्यांच्याकडे सोंपविलें आणि हिंदुस्थानचें वाढतें व स्वयंस्फूर्त सहकार्य मिळविण्यासाठीं हिंदुस्थानच्या राजकारणांतील कुजलेला डाव सोडविण्यासाठीं त्या प्रकरणीं जातीनें लक्ष घातलें.

## हिंदुस्थानांतील शिष्टाई

रशियन रणक्षेत्रावरील युद्धपरिस्थितीचें पारडें डिसेंबरपासूनच फिरलें व शूर रशियन सैनिकांनीं जर्मनांना झोडपून त्यांची लांडगेतोड करण्यास प्रारंभ केला. सर्व रणक्षेत्रांवरून जर्मनांना मार खात खात माघार घ्यावी लागली. हिटलरच्या वसंत ऋतूंतील संकल्पित चढाईचा कांटा मुळांतच उपटून काढण्यासाठीं हे भगीरथ प्रयत्न लाल फौजेनें चालविले आणि त्याला साथ देण्यासाठीं रॉयल एअर फोर्सनेंही जर्मनींतील लष्करी ठाण्यांवर जोराचे हल्ले सुरू केले. अटीतटीच्या या रणधुमाळींत ब्रिटिश साम्राज्यांतील हिंदुस्थान हें एकच राष्ट्र काय तें उदासीन होतें. हिंदुस्थानमधील विकोपाला गेलेला ज्ञातीय लढा यशस्वी रीतीनें सोडविण्याऐवजीं तो हिंदी ज्ञातींनींच आपापसांत सोडवावा असें धोरण ब्रिटिश सरकारनें स्वीकारल्यामुळें व या ज्ञातीय समेटावरच हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाची राजकीय आकांक्षा-तृप्ति अवलंबून ठेवण्यांत आल्यामुळें ब्रिटनच्या सद्धेतूबद्दल हिंदी बहुजन-समाज साशंक झाला होता. जपान हिंदुस्थानचें दार ठोठावूं लागल्यामुळें कालापव्ययाचें हें धोरण घातक ठरेल हें मि. चर्चिल यांनीं ओळखलें व हिंदी पुढारीही जागृतीचीं चिन्हें दाखवूं लागले. चीनचे सेनानी जनरल चिआंग कै शेक यांनीं हिंदुस्थानला भेट दिल्यावेळीं हिंदुस्थानला खरीखुरी सत्ता देण्याचा ब्रिटनला संदेश दिला. ता.११ मार्च रोजीं पार्लमेंटमध्यें मि.चर्चिल यांनीं एक भाषण करून ब्रिटिश युद्धमंडळानें हिंदुस्थानांतील राजकीय पेंचप्रसंगावर तोडगा काढणारी अशी एक नवी योजना तयार केल्याचें घोषित केलें आणि ही योजना हिंदी पुढाऱ्यांना पटविण्यासाठीं व त्यांचा तिला पाठिंबा मिळविण्यासाठीं सर स्टॅफर्ड क्रिप्स हे शिष्टाईसाठीं हिंदुस्थानांत जाणार आहेत असें सांगून सरकारचें हिंदुस्थानविषयक धोरण बदलल्याची खूणगांठ पटवून दिली. ता. २२ मार्च रोजीं सर स्टॅफर्ड हे हिंदुस्थानांत आले व त्यांनीं ता. ३० रोजीं या योजनेचें स्वरूप जाहीर केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
१२९६
REFBK-0005916

## १९४१

| | |
|---|---|
| २५ फेब्रुवारी | इटालियन सोमालीलँडचा पाडाव |
| ११ मार्च | उधार-उसनवट कायद्याला अमेरिकन काँग्रेसची मंजुरी |
| ३० | केरेनमध्यें हिंदी सैन्याचा प्रवेश |
| ४ एप्रिल | रशिदअलीची इराकमध्यें उठावणी |
| | लिबियामध्यें ब्रिटिश सेनेची माघार |
| | युगोस्लाव्हिया व ग्रीस यांवर जर्मनीची स्वारी |
| | युगोस्लाव्ह प्रतिकाराचा शेवट |
| २३ | ग्रीसमधील प्रतिकाराचा शेवट |
| ५ मे | हेले सेलासी यांचा आदिस अबाबामध्यें प्रवेश |
| १० | हेर हेस याचें इंग्लंडमध्यें आगमन |
| २० | क्रीट बेटावर जर्मन हल्ला |
| ३१ | इराक व इंग्लंड यांमध्यें युद्धतहकुबी |
| ८ जून | सीरियामध्यें दोस्तांची चाल |
| २२ | जर्मनीची रशियावर स्वारी |
| ९ जुलै | सीरियामधील युद्धाचा शेवट |
| १४ ऑगस्ट | चर्चिल-रूझव्हेल्ट युद्धहेतूंची अटलांटिक घोषणा |
| २५ | ब्रिटिश व रशियन सेनेची इराणमध्यें चाल |
| १६ सप्टेंबर | रेझाशहा यांचा राज्यत्याग |
| १८ नोव्हेंबर | लिबियांत ब्रिटिशांची पुन्हा चढाई |
| ७ डिसेंबर | ब्रिटन-अमेरिका यांचे विरुद्ध जपानी युद्धाला सुरुवात |
| १९ | जर्मन सेनेचीं सूत्रें हिटलरच्या हातीं |
| २७ | हाँगकाँगची शरणागति |

## १९४२

| | |
|---|---|
| १५ फेब्रुवारी | सिंगापूरचा पाडाव |
| ७ मार्च | रंगूनमधील माघार |
| ११ | सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या शिष्टाईची घोषणा |
| ३० | नव्या हिंदी सुधारणांची घोषणा |

# आजचें राजकारण

**चा**लू युद्धामुळें पुष्कळ नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांचा थोडक्यांत माहिती व्हावी म्हणून **ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनें आजचें राजकारण** ही स्वतंत्र मराठी पुस्तकमाला योजिली आहे. प्रत्येक पुस्तकांत २४ पानें मजकूर, चार पानें चित्रें असून त्याची किंमत फक्त तीन आणे ठेविली आहे.

## १ हिंदी कारखाने

**हिं**दी कारखान्यांतील क्रोडों रुपयांचा माल सध्यां सरकार खरेदी करीत आणखी क्रोडो रुपयांचा माल सरकारला हवा आहे. हिंदी उद्योगधंद्या बाबतचें सरकारी धोरण कसें बदललें आहे व त्यामुळें काय फायदा करून घेतां येईल याबद्दल माहिती प्रा. **द. गो. कर्वे** यांनीं या पुस्तकांत थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगितली आहे.

## २ चालू युद्धाचा इतिहास

लेखक–श्री. **रा. का. तटणीस**

## ३ चीन–जपान युद्ध

**ज**पान एवढें प्रबळ राष्ट्र; पण चार-साडेचार वर्षें झालीं, चीनमधील त्याची मोहीम कांहीं आटपत नाहीं. वास्तविक चीन म्हणजे अंतःस्थ यादवीनें पांगलेलें राष्ट्र. तरी जपानसारख्या शिस्तबाज व संघटित लष्करापुढें चीनचा टिकाव कसा लागला व चिनी बहाद्दरांनीं अद्भुत मर्दुमकी काय गाजविली हें श्री. **पु. रा. लेले** यांनीं आपल्या विवेचक पद्धतीनें या पुस्तकांत सांगितलें आहे.

## ४ रशिया

**अ**जिंक्य वाटणाऱ्या जर्मन सैन्याला माघार खायला लावली म्हणून रशियाबद्दल आज पुष्कळांना कौतुक वाटतें. शिवाय रशियानें यांत्रिक पैदास वाढविली; खासगी मालमत्तेचें प्रस्थ माजूं दिलें नाहीं; साक्षरतेचा, व वाचनालयांचा व्यापक प्रसार झपाट्यानें केला; समतेचें तत्त्व समाजांत फैलावून टाकलें.........इत्यादि अनेक कारणांमुळें रशियासंबंधीं उत्सुकता सर्वत्र दिसते. श्री. **पु. गो. काणेकरांचें** हें पुस्तक वाचून रशियाच्या कर्तबगारीची यथार्थ कल्पना येईल.

आणखी पुस्तकें तयार होत आहेत.


---

R. K. TATNIS, CHALU YUDDHACHA ITIHAS
(**Ajache Rajakaran**, No. 2) As. 3.